# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
## ४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
दुरध्वनी क्रमांक. ०२० २५६५६२३४, ईमेल ropune@dtemaharashtra.gov.in


जा.क्र.तंशि/विकापु/ससा/२०१९/ 2940 दिनांक - 17 JUL 2019

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/
विनाअनुदानित पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
पुणे विभाग पुणे शहर.

विषय -महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षा संदर्भात जनजागृती अभियान राबविण्याबाबत.

संदर्भ - पोलीस उपआयुक्त(वाहतूक)पुणे शहर यांचे पत्र क्र.पोउआ/वाहतूक/५८२९/१९, दिनांक १०/०७/२०१९.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले असून मा.पोलीस उपआयुक्त वाहतूक पुणे शहर यांनी पुणे शहरातील वाहतूक संदर्भातील समुपदेशन कार्यक्रमाचा लाभ या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालय, शैक्षणिक संस्था यामधील विद्यार्थी/विद्यार्थ्यीनी,अध्यापक स्टाफ अधिकारी,कर्मचारी यांना उपलब्ध करून देण्यासाठी आवाहन केलेले आहे. तसेच या समुपदेशन कार्यक्रमा संदर्भात पुणे शहर वाहतूक विभागाशी समन्वय साधून सहकार्य करण्याचे निर्देश देण्याची विनंती केलेली आहे.

याबाबत नमूद करण्यात येते की, पुणे शहर व आसपासच्या परिसरातील वाहतूक परिस्थिती पाहता असे लक्षात येते की, वाहनाचे प्रमाण हे नागरिकांच्या संख्येपेक्षा दिड पटीने वाढलेले आहे. वाहन चालकांची वाहन चालविण्याची अयोग्य सवय,निष्काळजीपणा व इतर अन्य बाबीमुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले असून त्यामुळे अपघाती मृत्यु संख्येतही वाढ झाल्याचे दिसून येत आहे. यासाठी रस्त्यावरील सुरक्षा तसेच मोटार वाहन चालवातांना घेण्याची काळजी या बाबत पुणे पोलीसांची वाहतूक शाखेमार्फत विविध स्तरावर नागरीकांसाठी जागरुकता अभियान सुरु करण्यात आलेले आहे. याचाच एक भाग म्हणून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा बाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

सर्व शैक्षणिक संस्थामधील विद्यार्थी हे उज्ज्वल भारताचे भविष्य असल्याने त्यांना सभोवतालच्या परिस्थितीबाबतची जागरुकता निर्माण करून दिल्यास ते याबाबत चांगला प्रतिसाद देवून एक जबाबदार नागरीक बनविण्यास सहाय्य करतात. तसेच आपल्या पालकांना व सहकारी मित्रांना रस्ता सुरक्षेचे महत्व पटवून देतात. यासाठी वाहतूक विभागामार्फत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी मुलभूत नियमाची माहिती व्हावी व रस्ता सुरक्षा बाबत त्यांच्या मनात सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलीस अधिकारी,कर्मचारी यांच्या समवेत सायकियाट्रिस्ट, सायकॉलॉजिस्ट, रस्ता सुरक्षा बाबत तज्ञ, व्यावसायिक मंडळीचा कक्ष तयार करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमातंर्गत आपल्या महाविद्यालयात वैयक्तिक जावून अथवा आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाहतूक शाखेत बोलावून रस्ता सुरक्षा, वाहतुकीचे मुलभूत नियम, सामाजिक जबाबदारी इ.बाबत मार्गदर्शन करण्याचे प्रस्तावित आहे. सदरचा कार्यक्रम संपूर्ण वर्षभर सुरु राहणार आहे. सदर कार्यक्रमा संदर्भात पुणे शहर वाहतूक विभागामार्फत पोलीस निरीक्षक श्री. राजेश पुराणिक यांची आयोजन व समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली असून त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९८७० १९६ ०७१ असा आहे.

तरी सदर वाहतूक संदर्भात समुपदेशन कार्यक्रमाचा लाभ आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थ्यीनी कर्मचारी याना करून देण्यासाठी पुणे शहर वाहतूक विभागाशी समन्वय साधून त्यांना सहकार्य करावे.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

प्रत - प्रोग्रामर सदर पत्र कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.